दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२३ ■ मंगळवार, दि. २५ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -323 ■ Tuesday, 25 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# छत्रपती संभाजीनगर आरटीओ कार्यालयाचा भोंगळ कारभार
# पैसे द्या आणि काहीही 'घोळ' करून घ्या

- काही भ्रष्ट आणि दलाल अधिकाऱ्यांनी लावला नेहमीप्रमाणे शासनाला चुना;
- थकबाकी असताना देखील नोटांचे बंडल घेवून केला गैरव्यवहार
- एक, दोन नाहीतर शंभरपेक्षा जास्त नागरिकांची केली फसवणूक

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याकडे लक्ष देण्याची गरज**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ)चा भोंगळ कारभार आपण नेहमीच पाहतो परंतु त्यांनी आता कहरच केला आहे. चक्क थकबाकी नावावर असतानादेखील वाहन हस्तांतरण केले. जे नियमबाह्य आहेत. वाहनधारकांना नियम आहेत त्यांनी ते पाळायचे आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांनी मात्र नियम तुडवायचे हे कोणी शिकवले. अशा कामचुकार आणि भिकार, भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण विभागच बदनाम होत आहे. त्यात बेजबाबदार अधिकारी मात्र चौकशी करायचे सोडून तक्रारकर्त्याला कोर्टात जाण्याचा फुकटचा सल्ला देतात. आरटीओचा कारभार म्हणजे पैसे द्या आणि काहीही घोळ करून घ्या असाच झालेला आहे. हे या प्रकरणावरून दिसून येते याचा सविस्त वृत्तांत.

छत्रपती संभाजीनगर आरटीओ कार्यालयाचा कारभारच न्यारा आहे येथे फक्त कार्यालयात काम करणारे कर्मचारी अधिकारी यांना पैसा दिला तर येथे काय पण होते असाच प्रकार एक धक्कादायक समोर आला आहे. रशपाल सिंग यांनी त्यांची चारचाकी पुर्वीची टॅक्सी जिचा टॅक्सी असताना क्रमांक एम. एच २० बी.टी. ५१९१ हा असुन टॅक्सी नंतर प्रायव्हेट क्रमांक एम.एच. २० सी. एच. २०५४ हा आहे. रशपाल सिंग यांनी छावणीतील गाडी मालक चरणजितसिंग व्होरा यांच्याकडून गाडी खरेदी केली तेव्हा गाडी विक्री करणार यांनी ५७ हजार रुपये टॅक्स थकबाकी असताना फक्त १३ हजार रुपये भरून दस्तावेज गाडीवर थकबाकी शिल्लक नाही असं भासवून आरटीओ कार्यालयात काम करणारे कर्मचारी अधिकारी यांनी देखील गाडी विक्री करणार यांच्याकडुन आर्थिक देवाण-घेवाण करून ४४ हजार थकबाकी असताना देखील दस्त खोटे बनवले. यामुळे परिवहन विभाग यांचे देखील अतोनात नुकसान झाले आहे. वाहतूकीच्या नवीन नियमांनुसार रशपाल सिंग यांनी गाडी नंबर प्लेट बदलुन घेण्यासाठी गेले असता त्यांना आरटीओ कार्यालयातील कर्मचारी यांनी सांगितले की आपल्या गाडीवर ८७ हजार रुपये टॅक्स थकबाकी आहे हे तुम्हाला भरावे लागतील तेव्हा रशपाल सिंग यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दाखल केली आहे.



संग्रहित छायाचित्र.

### भ्रष्ट अधिकाऱ्यांची मस्ती जिरवली पाहिजे...

रशपाल सिंग यांनी सांगितले की, या कार्यालयात शंभर पेक्षा अधिक गाडीचा गैरकारभार असाच झाला आहे. लाखो रुपये टॅक्स थकबाकी असताना देखील बेकायदेशीरपणे गाड्या नावांवर करण्याचा उपक्रम आरटीओ कार्यालयात सर्रास सुरू आहे. यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. तसेच अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना चांगलाच धडा शिकवला पाहिजे, अशा प्रकारे भ्रष्टाचार करताना थोडी लाज अधिकाऱ्यांना वाटली नाही हे नवलच आहे.

### भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठी सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार कुमठाळे यांचा आटापिटा

आरटीओ अधिकाऱ्यांवर कर्मचारी यांनी खुप मोठी भुरळ पाडली आहे. कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केला तरी पण या भ्रष्टाचारात अधिकारी बरबटलेले आहे. भ्रष्टाचारात अधिकारी यांचा सिंहाचा वाटा असतो. टॅक्स थकबाकी बाबतीत राजकुमार कुमठाळे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सर्व पत्रकार यांनी भ्रष्टाचार बाबतीत विचारणा केली असता या मुजोर अधिकारी यांनी दिलेल्या तक्रारीवरून चौकशी करून कारवाई करु अशी भुमिका घेण्याऐवजी थेट तुम्ही कोर्टात जा असं बोलुन मी पण या भ्रष्टाचारात समाविष्ट आहे असा प्रश्न उपस्थित करायला शंका निर्माण केली आहे. अधिकारी म्हणून केलेल्या चुकीच्या कामा बाबतीत कारवाई करण्याऐवजी जर समर्थन करत असेल तर नेमका अशा अधिकारी यांना पगार तरी नेमका द्यायचा कशाला . कुंपणच शेत खात असेल तर न्याय मागायचा कुणाला.

## कुंभमेळा प्राधिकरण कायदा लवकरच

नाशिक : कुंभमेळ्याची कामे त्वरित सुरू करण्यासाठी प्राधिकरण कायदा करण्यात येणार असून या प्राधिकरणात फक्त प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच स्थान देण्यात येणार आहे. साधू-महंतांचा त्यात समावेश नसेल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नाशिक येथील विविध कार्यक्रमांसाठी रविवारी नाशिक येथे आले असता शासकीय विश्रामगृहात माध्यमांशी संवाद साधला.

प्रारंभी कांद्याचे निर्यातमूल्य कमी करून केंद्राने राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल फडणवीस यांनी केंद्र शासनाचे आभार मानले. आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. गोदावरीतील पाण्याच्या दर्जाबाबत विचारले असता पाण्याचा दर्जा सुधारण्यासाठी पुढच्या महिन्यापासूनच मलनिस्सारण केंद्राचे काम सुरू करण्यात येणार आहे. गोदावरीतील २४ नाल्यांचे पाणी शुद्धीकरणासाठी लवकरच कृती कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्र्यंबकच्या विकासासाठी ११०० कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. सिंहस्थाच्या कामांना गती देण्याची गरज असल्याने लवकरच प्राधिकरण कायदा तयार करण्याची घोषणा त्यांनी केली. मात्र या प्राधिकरणात केवळ प्रशासकीय व्यक्ती असतील. धार्मिक व्यक्तींचा त्यात समावेश नसेल असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रयागप्रमाणेच सिंहस्थाची जबाबदारी घेणार का असे विचारले असता राज्यातील प्रत्येक कामाची जबाबदारी मुख्यमंत्र्यांवर असतेच त्यामुळे त्यासाठी वेगळी व्यवस्था गरजेची नसल्याचे ते म्हणाले. पालकमंत्र्यांची नियुक्ती अंतिम टप्यात असून, लवकरच घोषणा होईल, असेही त्यांनी सांगितले.

## दिड किलो गांजासह एक जेरबंद; पोलिसांची मोठी कारवाई

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरात अंमली पदार्थ विक्री व सेवन रोखण्यासाठी पोलिस आयुक्त प्रविण पवार यांच्या आदेशानुसार विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाने कारवाई करत एम.आय.डी.सी. वाळूज पोलीस ठाणे हद्दीतील साऊथ सिटी येथे छापा मारून मोठ्या प्रमाणात गांजा जप्त केला.

या कारवाईत आरोपी जीवन पदमसिंग महेर (वय ३५, रा. तपोवन परिसर, पळशी, ता. सिल्लोड) हा गांजाची विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून १ किलो ५८४ ग्रॅम वजनाचा गांजा, एक मोबाईल आणि इतर मिळून ४२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत त्याने हा माल शिवाजी वसंत (रा. रेलगाव, ता. सिल्लोड) याच्याकडून एसटी बसने आणल्याचे सांगितले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध एम.आय.डी.सी. वाळूज पोलीस ठाण्यात NDPS कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त प्रविण पवार, उप-आयुक्त प्रशांत स्वामी आणि सहाय्यक आयुक्त सुभाष भुजंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गीता बागवडे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## छत्रपती संभाजीनगर शहरात जमावबंदी आदेश लागू

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर शहरात आगामी सण, उत्सव आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अंतर्गत जमावबंदी लागू करण्यात आल्याचे आदेश पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी जारी केले आहे. शस्त्रे, स्फोटक पदार्थ, दगडफफेक, ध्वनिक्षेपकांचा वापर, उत्तेजित करणारी भाषणे व घोषणांवर बंदी असेल. पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास, मोर्चा किंवा आंदोलन करण्यास मनाई असेल. धार्मिक किंवा सामाजिक स्थळांवर अनुचित प्रकार घडू नये म्हणून विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. हा आदेश २५ मार्च २०२५ पासून ८ एप्रिल २०२५ पर्यंत लागू असेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कलम १३५ अन्वये कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी दिला आहे.

## राज्यात गटशेतीचे नवीन धोरण आणू - मुख्यमंत्री

पुणे : महाराष्ट्रात सुरू झालेले गटशेतीची मोठी लोकचळवळ पाहता गटशेतीचे एक नवीन धोरण राज्यात आणू; गटशेती करणाऱ्यांना कशा प्रकारे मदत, योगदान देता येईल; आणि गटशेतीला लोकचळवळीचे स्वरूप कसे देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आयोजित पाणी फाउंडेशनच्या 'सत्यमेव जयते' फार्मर कप- २०२४ पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या प्रसंगी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमिर खान, श्रीमती किरण राव, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ आदी उपस्थित होते.

शेती शाश्वत करायची असेल तर आपली गावे जलसमृद्ध, जलपरिपूर्ण होणे आवश्यक आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ५२ टक्के महाराष्ट्र अवर्षण प्रवण आहे, त्यामुळे जलसंधारणातूनच परिवर्तन करू शकतो. गावे पाण्याचे अंकेक्षण करणार नाहीत, त्यातील शास्त्र शिकणार नाहीत त्यात लोकसहभाग वाढणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र दुष्काळीच राहील हे लक्षात घेऊन राज्य शासनाने २०१५ साठी जलयुक्त शिवार योजना सुरू करून एक लोकचळवळ सुरू केली.

त्यावेळी पाणी फाउंडेशनने लोकांमध्ये जलसंधारणाच्या कामांची चुरस निर्माण केली. तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक व्यक्तींनी पाण्याचे काम पुढे नेले. पाणी फाऊंडेशन, नाम फाऊंडेशन यांनी या चळवळीला एक लोक चळवळीचे रूप दिले. आणि महाराष्ट्रातील २० हजार गावांनी स्वतःला जलसमृद्ध केले. फक्त पाण्याचे लेखापरीक्षण करून चालणार नाही तर शेतकरी सक्षम झाला तर पाण्याचे नियोजनही तो स्वतः करू शकतो. म्हणून फार्मर कप सुरू केला. सुरूवातीला गटशेतीअंतर्गत किमान २० शेतकरी आणि शंभर एकर जमीन असा गट तयार केल्यास एक कोटी रुपयांपर्यंत गटाला मदत दिली जात होती. ती चळवळ २०१९ नंतर थांबली होती. परंतु, अनेक गट त्यावेळी सुरू झाले. त्यामुळे आता गटशेतीचे एक नवीन धोरण राज्यात आणू, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, वातावरणातील बदलांचे परिणाम शेतीवर होणार नाही अशा प्रकारची शेती तयार करायची या दृष्टीने व्यापक स्वरुपात लाभ देण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना राज्य शासनाने सुरू केली. या योजनेला जागतिक बँकेने ४ हजार कोटी रुपये दिले आणि हा टप्पा यशस्वीपणे राबविल्यामुळे बँकेने दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार कोटी दिले. या योजनेचे काम चालू असलेल्या गावांमध्ये गटांची निर्मिती, यांत्रिकीकरण, यांत्रिकीकरणाची बँक तयार झाली आणि शेतीमध्ये मोठा बदल होत आहे.


धूत हॉस्पिटल जवळील श्रीरामनगर स्टॉप वर 'बर्निंग कार' जालन्याकडून येणाऱ्या वाहनामुळे प्रचंड वाहतूक कोंडी... बघ्यांची प्रचंड गर्दी ८. ३० च्या सुमारास लागली भीषण आग.

## पंतप्रधानही पाहणार छावा चित्रपट; संसदेत सिनेमाचे विशेष स्क्रीनिंग होणार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

संसदेतही छावा चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग होणार आहे. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मंत्री आणि खासदारांना देखील या चित्रपटाचे निमंत्रण असणार आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याच आठवड्यात संसदेत छावा चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग होणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून देशात या चित्रपटाची मोठी चर्चा आहे. या चित्रपटातील अभिनेता विकी कौशलने देखील विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने देशभर हजेरी लावली आहे.

या सर्व घडामोडींच्या दरम्यान महाराष्ट्र विधिमंडळाच्या सर्व सदस्यांसाठी मुंबईत विशेष स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि राज्य मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्री, राज्यातील आमदार देखील उपस्थित होते. यानंतर आता संसदेत देखील या चित्रपटाचे स्क्रीनिंग होत आहे. संसदेत छावाच्या विशेष स्क्रीनिंगच्या वेळी चित्रपटाचे दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते यांनाही बोलावले जाण्याची शक्यता आहे.

अष्टल संकेत

छत्रपती संभाजीनगर, मंगळवार, दि. २५ मार्च २०२५



# अर्थव्यवस्था हेलपाटून जाऊ नये....

२०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नात दोन लाख ७८ हजार रुपयांवरून ३ लाख ९ हजार रुपयांपर्यंत वाढ झाली असली, तरी देशपातळीवर दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो, पहिला नव्हे! गुजरातने निर्यात आणि दरडोई उत्पन्नातही महाराष्ट्राला मागे टाकून पुढचे स्थान पटकावले आहे. आधी तेलंगण, कर्नाटक, तमिळनाडू, गुजरात आणि नंतर मग महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. २०२३-२४ मध्ये राज्याचा विकासदर आठ टक्के होता. २०२४-२५ मध्ये घसरून तो ७.३ टक्क्यांवर येईल. याचा अर्थ 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे म्हटले जात असले, तरी तो फक्त प्रचाराचाच भाग आहे. उद्योगक्षेत्रात देशात वर्षानुवर्षे आपण अग्रेसर राहिलो. परंतु या क्षेत्राचा विकासदर गेल्या वर्षाच्या ६.२ टक्क्यांवरून घटून ४.९ टक्के होईल, असा अंदाज आहे. त्यातही उत्पादन किंवा निर्मितीक्षेत्रात २०२३-२४ मध्ये विकासदर ६.८ टक्के होता. घसरण होऊन यंदा तो ४.२ टक्के होण्याची शक्यता आहे. वास्तविक, शेतीमधून जास्तीत जास्त लोकांना बाहेर आणून उद्योगात सुस्थापित करायचे असेल तर निर्मितीक्षेत्राचा विस्तार व्हायला हवा. शेती आतबट्ट्याची असल्यामुळे, उत्पादनक्षेत्राची भरभराट होणे आवश्यक आहे. त्याऐवजी प्रगतीचा वेग मंदावणे, ही चिंतेची बाब आहे. उद्योग, सेवाक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. पण सेवाक्षेत्रातही ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्के अशी पिछेहाट झाली आहे. आज महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक येत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु त्या प्रमाणात रोजगारात वाढ होत असल्याचे दिसत नाही. गेल्या तीन वर्षांमध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या ५८ लाखांवरून ७० लाखांपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याचे बंधन शासनावर आहे. परंतु चालू आर्थिक वर्षात महायुती सरकारने या खर्चाला लक्षणीय प्रमाणात कात्री लावली आहे. तसेच डबल इंजिन सरकार असल्याचे सांगितले जात असले, तरी यंदा केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीमध्ये १९ टक्क्यांची घट होणार असल्याची माहिती आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला ३५०कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. परंतु एसटीला ९९३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. महामंडळाकडून ३ हजार २६० कोटी रुपयांची देणी थकीत आहेत. या परिस्थितीत महामंडळाने कारभार कसा करायचा, असा प्रश्न आहे.

मागील वर्षी उत्तम पाऊस झाल्यामुळे शेती आणि संलग्न क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात ३.३ टक्के असलेला विकासदर यंदा ८.७ टक्क्यांवर गेला. परंतु यात राज्य सरकारचा असा काहीच वाटा नाही. उलट, राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र नक्की किती वाढले, याची आकडेवारी गेली बारा वर्षे दिली जात नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबद्दलचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्ष सिंचनक्षेत्र किती वाढले, हे जनतेला कळणे आवश्यक आहे. आजही राज्याची अर्थव्यवस्था सिंचनावर अवलंबून असून अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र खूप कमी आहे. कृषी प्रक्रिया उद्योग वाढले पाहिजेत, असे केंद्र आणि राज्य सरकार सतत सांगत असते. परंतु त्यासाठी कृषी सिंचनात लक्षणीय वाढ होणे आवश्यक आहे. राजकोषीय तूट कमी असावी अशी तरतूद असली, तरी यंदा आपण तुटीच्या सीमारेषेच्या जवळ आलो आहोत, ही नक्कीच काळजी करण्यासारखी बाब आहे.

महाराष्ट्रातील किरकोळ व्यापारात घट झाली आहे. म्हणजे, लहान-लहान दुकाने, चहा, किराणा वगैरे. त्याउलट ठोक व्यापारात रोजगाराचा टक्का वाढला आहे. छोटे व्यापारी व्यवसाय बंद होत आहेत, तर मोठे वाढत आहेत. वाहतूक सेवेतील रोजगाराची टक्केवारी कमी झाली आहे. पर्यटक, टॅक्सी, ऑटो रिक्षा यात आता पूर्वीसारखी रोजगारक्षमता राहिलेली नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या टक्केवारीत घट झाली आहे. वस्त्रोद्योगाचे लहान लहान व्यवसाय किंवा छोटे कारखाने यात रोजगाराचा टक्का वाढला आहे. यातील बहुसंख्य महिला आहेत आणि त्यांचे शिलाईचे अगदी लहान, घरगुती स्वरूपाचे व्यवसाय आहेत. इथे टक्केवारी वाढते आहे. आर्थिक निकड भागवण्यासाठी यातील बहुतेक व्यवसाय केले जातात. यातून कुटुंबांवर वाढलेला आर्थिक ताण दिसतो. टपऱ्यांवर अवलंबून असलेल्या रोजगाराचे प्रमाणही वाढले आहे. यातूनही वाढलेला आर्थिक ताण दिसून येतो. घरकामातून रोजगार मिळवणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे. वित्तीय सेवांमधील रोजगाराची टक्केवारी वाढली आहे. यात प्रामुख्याने पतपेढी वगैरे रोजगार आहे. शेतीबाहेर रोजगाराची टक्केवारी वाढत आहे, हे चांगले; पण त्यातील बराच रोजगार आर्थिक ताणातून काही तरी करण्याची गरज असल्यामुळे केलेला, कमी उत्पादक, कमी मोबदला असलेला, लहान धंदे बंद पडून होत असलेला अस्थायी स्वरूपाचा आहे हे चांगले नाही. हे निष्कर्ष भारत सरकारच्या 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे'वरून काढले आहेत. महाराष्ट्रातील दारिद्र्य आणि विषमता, २०२२-२३ च्या राष्ट्रीय नमुना चाचणीच्या 'कन्झंप्शन एक्स्पेंडिचर सर्व्हे'वरून प्रत्येक राज्यातील दारिद्र्याचे आणि विषमतेचे प्रमाण काढता येते.

# हवामान : हवेतील गोष्टींचा अभ्यास

## (विश्व हवामान दिवस.)

**जागतिक हवामान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. दि.२३ मार्च १९५०मध्ये जागतिक हवामान संस्था स्थापन झाली. म्हणून हा जागतिक हवामान दिवस म्हणून निवडण्यात आला. हवामानाबाबत संपूर्ण जगातील लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी व हवामानाचे महत्व समजावे, तसेच हवामान चांगले राहण्यासाठी कोणती दक्षता घेतली पाहिजे, कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे याविषयी जाणीव-जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक हवामान दिवस महत्वपूर्ण.**

माणसाने विज्ञानाच्या जोरावर मोठ्या प्रमाणात प्रगती केली. परंतु हे करीत असताना निसर्गचक्राच्या गतीला बाधा निर्माण झाली. त्यातूनच पर्यावरणाचा समतोल ढासळत गेला. सुरुवातीला याचे प्रमाण कमी होते, परंतु आता मोठ्या प्रमाणात रासायनिक, आधुनिक अशा अनेक साहित्याच्या वापरामुळे हवामानाच्या हानीचा उच्चांक गाठला गेला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पृथ्वीवरील पर्यावरणाच्या चक्राचा समतोल बिघडलेला दिसून येतो. मानवनिर्मित आधुनिकीकरणामुळे पृथ्वीवर हवामानात मोठ्या प्रमाणात अनपेक्षित बदल घडत आहेत. हवामानातील या अनपेक्षित बदलांमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे, मानवी साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान तर होतेच शिवाय मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही होते. मानव विकासाच्या प्रयत्नाने माणूस निसर्गात खुप ढवळाढवळ करत आहे. त्याचेच हे दुष्परिणाम पुढे पुढे दिसून येत आहेत. मानवासोबतच इतर प्राणी, पक्षी यातून सुटू शकत नाहीत. कारण पृथ्वीवरील सजीवांची जैविक साखळी आहे, ती एकमेकांवर अवलंबून आहे. त्यामुळे एका घटकातील बदलाचा परिणाम इतर घटकांवर झालेला दिसून येतो. पृथ्वीवर सजीव सृष्टी व मानवी जीवनासाठी पोषक वातावरण असल्याने पृथ्वीवर मानवाचे अस्तित्व टिकून आहे. मानव ज्या ठिकाणी वास्तव्य करतो त्याच्या सभोवतालच्या हवामानाचे नाते त्याच्याशी अतिशय घनिष्ठ असते. त्यामुळेच मानवाच्या अस्तित्वाला अर्थ आहे. म्हणून हवामान हे मानवाच्या जगण्याची आवश्यकता आहे. कारण हवामानाचा मानवी जीवनावर खोलवर परिणाम होतो. मानवाचे भरण-पोषण करण्यात हवामानाचे नाना आविष्कार महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे हवामानाचे एक प्रकारे आविष्कार आहे.

चक्रीवादळे ओडिशाच्या किनारपट्टीवर धडकतात, तेव्हा भारत अक्षरशः वादळाच्या नजरेत असतो. चक्रीवादळे भारतासाठी नवीन नाहीत, परंतु भारताने एक प्रचंड यशस्वी निर्वासन कसे काढले- इतिहासातील सर्वात मोठे- चक्रीवादळ येण्यापूर्वी एक दशलक्षाहून अधिक लोक सुरक्षित आश्रयस्थानी स्थलांतरित झाले हे विशेष होते. प्रचंड जीवांची शोकांतिका काय असू शकते, सन १९९९च्या चक्रीवादळामुळे झालेल्या १० हजार मृत्यूंच्या तुलनेत या स्थलांतरामुळे फक्त ४० मृत्यू झाले. येथे इतके जीव वाचवण्यात कशामुळे मदत झाली? अचूक हवामान अंदाज जगभरातील हजारो जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हवामान, आपल्या सभोवतालच्या वातावरणाची स्थिती म्हणून परिभाषित केलेले, अतिशय गतिमान आहे. गरम किंवा थंड, ओले किंवा कोरडे, शांत किंवा वादळी, स्वच्छ किंवा ढगाळ, धुके किंवा धुकेसदृश्य प्रत्येक स्थितीचा आपल्या जीवनावर काही परिणाम होतो. बियाणे पेरण्यापूर्वी शेतकरी ढगांचा शोध घेतात, पायलट टेकऑफ किंवा उतरण्यासाठी दृश्यमानतेवर अवलंबून असतात, खलाशी वाऱ्यावर आधारित जहाजाची पाल बसवतात आणि अनेक क्रीडा स्पर्धा पावसाच्या दयेवर असतात. पावसाच्या सरी बंगळुरूमधील वाहतूक सुरळीतपणे किंवा विस्कळीत करू शकतात! खूप काही धोक्यात असताना आपल्या अस्तित्वासाठी हवामान समजून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच हवामानशास्त्र नावाच्या विज्ञानाच्या एका नवीन शाखेचा उदय झाला आहे. ग्रीक शब्द 'मेटीओरॉस'पासून व्युत्पन्न, ज्याचा अर्थ 'उंच आकाशात' असा होतो, हवामानशास्त्रात या शब्दाचा अनुवाद 'हवेतील गोष्टींचा अभ्यास' असा होतो. भारतीय संदर्भात हवामान समजून घेण्यासाठी अनेक अत्यावश्यकता आहेत. भारतासारखा देश, जो प्रामुख्याने शेतीवर आधारित अर्थव्यवस्था आहे, हवामानशास्त्र अतिशय समर्पक आहे. मान्सूनचा पाऊस वर्षातील चार महिने टिकतो, त्यामुळे आपली शेती आणि पाण्याच्या गरजांवर परिणाम होतो आणि त्याचा अंदाज लावण्याची क्षमता अत्यंत गंभीर बनते, असे प्रा.जे श्रीनिवासन सेंटर फॉर ॲटमॉस्फेरिक अँड ओशनिक सायन्सेस (सीएओएस), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथील प्राध्यापक म्हणतात, ङ्गमाझ्या मते, भारताने हवामानशास्त्रासाठी अधिक पैसा आणि संसाधने खर्च केली पाहिजेत.

मानवतेसाठी हवामानशास्त्राचे महत्त्व ओळखून, संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेने दरवर्षी २३ मार्च हा जागतिक हवामान दिन -डब्ल्यूएमडी- म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे आणि २०१७ची थीम 'अंडरस्टँडिंग क्लाउड्स' अशी घोषित केली होती. हा एक खास मार्ग आहे, पावसाच्या हार्बिंगर्सचे आभार व्यक्त करण्याचा. हवामानशास्त्राचा संस्थापक मानला जाणारा, प्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञानी अरिस्टॉटल यांचे ३५० ईसा पूर्व मधील 'हवामानशास्त्र' या ग्रंथात पाऊस आणण्यासाठी जबाबदार असलेल्या जलचक्राचे वर्णन केले आहे. परंतु ढग निर्मिती आणि पाऊस आणि सूर्याभोवती पृथ्वीच्या हालचालींमुळे होणारे ऋतुचक्र याविषयीचे भारतीय ज्ञान उपनिषदांच्या काळापासूनचे आहे. वराहमिहिराचे शास्त्रीय ग्रंथ 'बृहतसंहिता' सुमारे ५०० एडीमध्ये लिहिलेले, त्या काळात अस्तित्वात असलेल्या वातावरणातील प्रक्रियांच्या सखोल ज्ञानाचा स्पष्ट पुरावा देते. जगभरातील तत्सम कार्यांमुळे ऋतू, वारा, गडगडाट, विजा, बर्फ, पूर, दऱ्या, नद्या इ.यासारख्या इतर वातावरणीय घटनांबद्दलचे आकलन समृद्ध झाले आहे. १५व्या शतकात पर्जन्यमान मोजण्यासाठी कोरियाच्या प्रिन्स मुंजॉन्ग यांनी पहिल्या प्रमाणित पर्जन्यमापकाचा शोध घेऊन हवामानशास्त्रातील एक नवीन युग चिन्हांकित केले. ॲनिमोमीटर- वाऱ्याची शक्ती मोजण्यासाठी, थर्मोस्कोप- तापमान मोजण्यासाठी, पारा बॅरोमीटर- वातावरणाचा दाब मोजण्यासाठी आणि हायग्रोमीटर- आर्द्रता मोजण्यासाठी यांसारख्या उपकरणांच्या नंतरच्या शोधांमुळे आम्हाला हवामानावर परिणाम करणारे घटक मोजण्याची क्षमता मिळाली. या उपकरणांव्यतिरिक्त, बर्फाची निर्मिती, हायड्रोडायनॅमिक्स, वायूंचे गतिज सिद्धांत, थर्मोडायनामिक्सचे नियम, ढगांची ओळख आणि वर्गीकरण आणि वाऱ्याच्या गतीचे वर्गीकरण यावरील विविध वैज्ञानिक प्रबंधांमुळे वातावरणातील विविध घटनांबद्दलची आमची समज वाढली. या व्याख्यांचा मूर्त परिणाम म्हणजे पहिला आंतरराष्ट्रीय क्लाउड ॲटलस जो १९व्या शतकाच्या शेवटी छापला गेला.

सद्य परिस्थितीवर आधारित हवामानाचा अंदाज घेण्यासाठी १७व्या शतकात हवामान निरीक्षण नेटवर्क सुरू करण्यात आले होते, जेथे डेटा नियमित अंतराने गोळा केला गेला आणि मैल दूर असलेल्या प्रक्रिया केंद्रात पाठविला गेला. टेलीग्राफच्या आगमनाने विस्तृत क्षेत्रातून हवामान निरीक्षणांचे द्रुत संकलन सक्षम केले, ज्याचा उपयोग प्रदेशासाठी वातावरणाच्या स्थितीचे नकाशे तयार करण्यासाठी केला जात असे. सन १८६०मध्ये प्रथम दैनिक हवामान अंदाज वृत्तपत्रांवर आला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात, भारतासह अनेक देशांनी राष्ट्रीय हवामान सेवांची स्थापना केली. भारत हवामान विभाग- आईएमडी, सन १८७५मध्ये स्थापित आज हवामानशास्त्र, भूकंपशास्त्र आणि इतर संबंधित क्षेत्रांशी संबंधित सर्व बाबींमध्ये प्रमुख सरकारी संस्था आहे. २०व्या शतकाच्या पहाटेने हवामानशास्त्रातील तांत्रिक प्रगतीला वेग दिला- हवामान उपग्रह, संगणक आणि जलद संप्रेषण वाहिन्यांनी हवामान समजून घेण्याचा आणि अंदाज लावण्याचा एक नवीन अध्याय उघडला. 'गेल्या शतकात हवामानशास्त्राच्या क्षेत्रात तीन क्रांतिकारक बदल झाले आहेत- उपग्रह, संगणक आणि दळणवळण' अशी प्रो. श्रीनिवासन यांनी टिप्पणी केली, ङ्गत्यांनी आमच्या वातावरणाच्या आकलनात क्रांती घडवून आणली आहे.

एप्रिल १९६०मध्ये एनएएसए- नासाद्वारे टीआईआरओएस-१ या पहिल्या यशस्वी हवामान उपग्रहाच्या प्रक्षेपणाने 'आकाशात डोळा' लावला. तेव्हापासून, चीन, भारत, रशिया आणि युरोपियन युनियनमधील अनेक देशांनी त्याचे अनुसरण केले आहे आणि हवामानविषयक उपग्रहांची स्वतःची मालिका प्रक्षेपित केली आहे. कॅमेरे आणि सेन्सर्सने सज्ज असलेले हे उपग्रह पृथ्वीला उत्तर-दक्षिण दिशेला- ध्रुवीय परिभ्रमण फिरवतात किंवा फिरणाऱ्या पृथ्वीच्या- भूस्थिर संदर्भात स्थिर राहतात. उपग्रह केवळ ढग आणि ढग प्रणालींपेक्षा बरेच काही पाहू शकतात- शहरातील दिवे, आग, प्रदूषणाचे परिणाम, अरोरा, वाळू आणि धुळीची वादळे, बर्फाचे आवरण, महासागरातील प्रवाह, ऊर्जा प्रवाह इ. ङ्गसॅटेलाइट इमेजेस महासागरांवर पर्जन्यवृष्टी कशी होते, वादळ कसे जन्माला येते आणि जमिनीवर कसे सरकते, हे समजते, जे आधी अशक्य होते ते समजून घेतेङ्क, प्रो.श्रीनिवासन म्हणतात, 'उपग्रहांद्वारे, आम्ही आता प्रत्येक चक्रीवादळ आणि प्रत्येक वादळावर लक्ष ठेवत आहोत आणि आम्हाला आश्चर्यचकित करणारे काहीही नाही.' २०व्या शतकाच्या सुरूवातीपासून, गणित आणि भौतिकशास्त्रातील एक समस्या म्हणून हवामान अंदाजाकडे पाहिले जात होते ज्याने गणिते आणि भौतिकशास्त्राच्या नैसर्गिक नियमांवर आधारित उपाय मागितले होते, त्यामुळे अंकीय हवामान अंदाजांना जन्म दिला. तथापि, गणितीय मॉडेल्स सोडवण्यामध्ये गुंतलेल्या गणनांच्या पूर्ण संख्येने संगणकाच्या आगमनापर्यंत त्याची पूर्ण क्षमता मर्यादित केली. आज, बहुतेक हवामान संस्था सुपरकॉम्प्युटर वापरतात जे सेकंदाला दहा लाख कोटी गणना प्रक्रिया करू शकतात, त्यामुळे अंदाज अचूकता वाढते.



– संकलन व शब्दांकन –

**श्री एन. के. कुमार**

जी. से.नि.अध्यापक.

गडचिरोली मोबा-७७७५०४१०८६.

दिवसेंदिवस वातावरण आणि विविध घटकांबद्दलची आपली समज जसजशी वाढत जाते, तसतसे जगभरातील हवामानशास्त्रज्ञ सद्य हवामान आणि तापमान, दाब आणि वारा यांसारख्या पर्यावरणीय परिस्थितींचा विचार करून वातावरणाच्या भविष्यातील स्थितीचा अंदाज घेण्यासाठी मजबूत गणितीय मॉडेल तयार करत आहेत. प्रचंड संगणकीय क्षमतेने समर्थित, ही मॉडेल्स आता वाढीव रिझोल्यूशनसह चालविली जाऊ शकतात. नेहमीच्या गडगडाटी वादळाला किंवा चक्रीवादळाला राक्षसात रूपांतरित करू शकतील अशा छोट्या-छोट्या परिस्थितींचे अनुकरण करणे आता सोपे काम आहे. ङ्गआम्ही सांख्यिकीय अंदाजावरून संगणक आधारित अंदाजाकडे वळलो आहोत ज्यामध्ये उपग्रहांकडील डेटा आत्मसात करणारे चांगले मॉडेल समाविष्ट आहेत. आपले वातावरण अतिशय गुंतागुंतीचे असल्याने, चक्रीवादळांसारख्या मोठ्या घटनांचे भाकीत करणे, जे पूर्वी अव्यवहार्य होते, ते आता कोणत्याही अडचणीशिवाय केले जातेङ्क प्रो.श्रीनिवासन स्पष्ट करतात. आता, हवामानशास्त्रज्ञ पुढील १२, २४, ३६, ४८ आणि ७२ तासांसाठी अचूक अंदाज बांधतात आणि या प्रक्रियेत आम्हाला नैसर्गिक आपत्तींना चांगला प्रतिसाद देण्यात मदत करतात.

इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि बिग डेटा सारख्या अग्रगण्य तंत्रज्ञानासह हवामानशास्त्राचे भविष्य कसे दिसते? 'ज्याप्रकारे गोष्टी घडत आहेत, मला खात्री आहे की हवामानशास्त्राचे भविष्य खूप रोमांचक असेल,' असे मत प्रा.श्रीनिवासन यांनी व्यक्त केले. ङ्गआज, सेन्सर लहान आणि स्वस्त होत आहेत, जे डेटा संकलनात क्रांती घडवून आणतील. कॉम्प्युटिंगची प्रचंड शक्ती आपल्याला वातावरणातील जटिल घटनांचे अगदी कमी रिझोल्यूशनमध्ये मॉडेल बनविण्यास सक्षम करतेङ्क असेही ते पुढे म्हणाले. हवामानशास्त्राचे क्षेत्र मान्सूनचा अचूक अंदाज लावणे किंवा पृथ्वीच्या पृष्ठभागापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील ढगांची प्रत्येक हालचाल समजून घेणे यासारख्या बौद्धिकदृष्ट्या उत्तेजक आव्हानांनी भरलेले आहे. पुढील पन्नास वर्षे व्यग्र ठेवण्यासाठी या क्षेत्रातील आव्हाने भरपूर आहेत! ही आव्हाने सोडवल्यास भविष्यात नाट्यमय परिणाम मिळतील.ङ्क अशी टिप्पणी प्रा.श्रीनिवासन यांनी केली.

निसर्गाचे मार्ग डीकोड करण्याचा मानवतेचा शोध कधीही संपत नाही आणि हवामानशास्त्रही त्याला अपवाद नाही. हवामानाचे कोडे समजून घेण्याच्या आमच्या छोट्या पण महत्त्वाच्या पावलांनी आता आम्हाला अशा माहितीने सशक्त केले आहे जे निसर्गाच्या खेळाविरूद्ध ट्रम्प कार्ड असू शकते. याची आठवण करून देण्यासाठी आणि हवामान बदलासारखे मोठे आव्हान सोडवण्याचे संकेत मिळावेत यासाठी आजच्यापेक्षा चांगला दिवस तो कोणता?

!! विश्व हवामान दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# निरोगी आरोग्य राहण्यासाठी टिप्स

**– जर आपण कायम निरोगी राहू इच्छिता तर पुढे आपणास निरोगी राहण्यासाठी काय करावे देत आहोत. या टिप्स आपण आपल्या दैनदीन जीवनात सामील करून निरोगी शरीर प्राप्त करू शकतात.**

**१)पुरेशी झोप घ्या –** एका सामान्य शरीराला ७ ते ८ तासांची गाढ झोप आवश्यक असते. ७ ते ८ तासांची झोप घेतल्याने शरीरात ऊर्जा निर्माण होते. म्हणून रात्री १० वाजेच्या आत झोपण्याचा प्रयत्न करावा व सकाळी ६ च्या आत अंथरुणातून उठून जावे. लवकर झोप येण्यासाठी घरगुती उपाय आपण येथे क्लिक करून वाचू शकता.

**२)सकाळी उठताच पाणी प्यावे –** सकाळी उठल्याबरोबर तोंड आणि दात स्वच्छ न करता एक लिटर पाणी प्यावे. सकाळी उठल्यावर आपल्या लाळेत लायसोझाइम हा पदार्थ तयार झालेला असतो व उठल्याबरोबर वरून एक ग्लास पाणी पिल्याने लायसोझाइम एंजाइम पोटात जाऊन पचन संस्थेची स्वच्छता करतात. म्हणून दररोज सकाळी उठताच तोंड न धुता एक लिटर पाणी हळुवार प्यावे.

**३)ऊन अंगावर घ्या–** सकाळचे कोवळे ऊन शरीरावर घेतल्याने शरीराला विटामिन-ऊ मिळते. विटामिन डी शरीराची त्वचा आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाची हेल्थ टीप आहे.

**४)सकाळी उठल्यावर योग व एक्सरसाइज करा–** नियमितपणे सकाळी उठून ध्यान, योगासने आणि प्राणायाम केल्याने शरीरात उत्साह वाढतो, निरोगी शरीरासोबत, चेहरा देखील उजळून निघतो. म्हणून सकाळी उठल्यावर १ तास व्यायाम आणि योगासने करावीत.

**५)सकाळचा नाश्ता जरूर करा**

चांगले आरोग्य मिळविण्यासाठी सकाळी सकाळी शरीराला प्रोटीन आणि कार्बोहाइड्रेट मिळणे आवश्यक आहे. जर आपण सकाळी नाश्ता करीत असाल तर शरीरात संपूर्ण दिवस ऊर्जा कायम राहील. म्हणून प्रोटीन युक्त आहार ग्रहण करणे आवश्यक आहे. प्रोटीन युक्त डायट प्लान येथे याची माहिती वाचा.

**६) जेवणानंतर लगेच पाणी पिऊ नये**

अनेक लोकांना जेवल्यानंतर लगेच भरपूर पाणी पिण्याची सवय असते. परंतु आपणास सांगू इच्छितो की असे करणे फार चुकीचे आहे. जेवण केल्यावर आपले पचन तंत्र आणि जठराग्नी क्रियाशील असतात.

शरीरात अन्न पचवण्याकरिता पुरेशी हिट निर्माण झालेली असते. परंतु जर तुम्ही जेवण झाल्यावर लगेजच पाणी पीत असाल तर जठराग्नी मंद होते परिणामी खाल्लेले अन्न व्यवस्थित पचत नाही आणि शरीरात ऊर्जा निर्माण होत नाही. म्हणून जेवण झाल्यावर लगेच पाणी न पिता फक्त गुळण्या कराव्यात आणि एक ते दीड तासानंतर पाणी प्यावे. ही marathi tips for health निरोगी शरीर ठेवण्याकरीता खूप महत्वाची आहे.

**७) जेवण बारीक चावून चावून खावे**

तोंडात असलेली लाळ (Saliva) अन्नाचे पचन करण्यासाठी फार उपयुक्त आहे. आपण तोंडातील घास जेवढा चावून खावू तेवढीच लाळ त्यात मिसळली जाईल. व जास्तीत जास्त लाळ मिसळल्याने लाळेमधील शपूाशी अन्नासोबत मिक्स होतील व पचन सुधारेल. म्हणून अन्नाचा कोणताही घास ३० ते ३५ वेळा चावावा आणि मगच त्याला गिळावे.

**८) नेहमी खाली बसून भोजन करावे**

भारतीय बैठक म्हणजेच खाली बसून, मांडी वाळून जेवण केल्याने शरीराची पोझिशन नेचुरल होते. या स्थितीत पाठीचा कणा आणि शरीरातील सर्व स्नायू रिलॅक्स झालेले असतात. या पद्धतीत बसून जेवल्याने पचन तंत्र मजबूत होते.

**१०) शरीराची मालिश –** आठवड्यातून एकदा संपूर्ण शरीराची मालिश केल्याने शरीरात नव उर्जेचा संचार होतो. प्रत्येक आठवड्याला संपूर्ण शरीराची मालिश तीळ, सरसो आणि इतर आयुर्वेदिक तेलाने करावी. तेल मालिश केल्याने शरीरातील नसांमध्ये रक्ताचा प्रवाह सुरळीत होतो व हाडे मजबूत होतात.

**११) धूम्रपान, चहा, कॉफी आणि फास्ट फूड चे सेवन टाळावे –** धूम्रपान केल्याने शरीराचे स्वास्थ्य बिघडणे निश्चित आहे. याशिवाय चहा, कॉफी मध्ये देखील caffeine असते जे शरीरासाठी हानिकारक असते. फास्ट फूड खाल्ल्याने शरीराचे वजन वाढायला लागते. म्हणून धूम्रपान, चहा, कॉफ्फी आणि फास्ट फूड इत्यादी हानीकारक पदार्थांचे सेवन शक्य तेवढे टाळावे.

**१२) सकाळ संध्याकाळ फिरावे –** दररोज सकाळी व संध्याकाळी फिरण्याची सवय लावून घ्या. चालणे हा सर्वात उत्तम व्यायाम आहे. म्हणून दररोज शक्य होईल तेवढे वेगाने चालत जावे.

तर मित्रहो ह्या लेखात आपण म्हणजेच निरोगी राहण्यासाठी काय करावे याबद्दलची माहिती प्राप्त केली. आशा आहे की ही मराठी माहिती आपणास उपयुक्त ठरली असेल. या माहितीला आपले कुटुंबीय आणि मित्रांसोबत शेअर करून त्यांचेही ज्ञान वाढवा.

# आज प्रत्येक क्षणाला माणूसकी हरवल्याचं दर्शन

**हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला माणसाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. घरात, समाजात, प्रवासात, माणूसकी हरवत चालली आहे याचं फ्फार दु:ख आहे. प्रत्येक क्षणाला माणूसकी हरवल्याचं दर्शन घडत आहे. आज माणसातला माणूस मरून पडलाय की काय असं वाटू लागलं आहे. मोठी दुर्घटना घडते, इम ारत कोसळते, अपघात होतो. ढिगाऱ्याखाली माणसं मरून पडली असताना हे सारं पाहण्यासाठी गर्दी होते ती माणूसकी हरवलेल्या माणसांची. अशा वेळी मोठी व्यक्ती येते व मदत (अर्थिक) करण्याचे अश्वासन देते आणि निघून जाते. त्याच ठिकाणी दुसरीकडे गर्दीतलाच एक माणूस ढिगाऱ्याखाली मेलेल्या, गाडल्या गेलेल्या हाडामासाच्या माणसाच्या अंगावरचे मौल्यवान वस्तू काढण्यात मग्न असतो व दुसरा अपघाताचे छायाचित्रे, चलचित्र काढण्यात मग्न असतो. जर एखादी मौल्यवान वस्तू माणूस काढू शकत नाही तर अक्षरशः हातात सोन्याची अंगठी असलेले बोटंच छाटून घेऊन जाण्याचा प्रकार घडताना दिसतो. अशावेळी मदतीचा हात देणाऱ्या गर्दीची फार गरज असते.**

**रस्त्यावर** वाहणाचा अपघात झाल्यावर हीच तोबा गर्दी जमते. माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडला असताना तो जीव वाचवण्यासाठी मदतीचा हात मागत असतो. तेथेही गर्दीत माणसांची अपघाताचे छायाचित्रे काढण्यास चढाओढ लागलेली असते. अशावेळी जखमीला वेळेवर मदत न मिळाल्यामुळे प्राणही गमवावे लागतात. काहीजण तर असेही असतात कि ते गर्दीत येत नाही. लांबूनच पाहून निघून जातात कारण त्यांच्या मनाला असं वाटत असतं कि, आपण ज्या कामाला जात आहे तेथे जाण्यास उशीर होत आहे. पण त्यांना हे कळत नाही की, आपण जर जखमीला मदत करण्यास उशीर केला तर तो देवाघरी लवकर निघून जातील.

खूप दान धर्म करणारी मंडळी या जगात आहेत. एकीकडे असेही चित्र दिसतं की, दान धर्म करणारी व्यक्ती घरात असणाऱ्या (थकलेले) आई वडीलांकडे अजिबात लक्ष देत नाही. कधी काळी थकलेल्या आई वडिलांना त्रासही दिला जातो. घरात आई वडिलांना उपाशी ठेवून बाहेर दान धर्म करत असताना त्यांना पुण्य कसे लाभेल. माणूसकी हरवलेला मुलगा घरात असेल तर आई वडिलांचे असेच हाल होणारच.

जीवाला वैतागलेली व्यक्ती जेव्हा आत्म हत्येचा प्रयत्न करत असते तेव्हा आजूबाजूची जनता फ्फक्त तमाशा बघत असते. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला वाचवण्याचा कोणीही प्रयत्न करीत नाही. याच्या उलट ती व्यक्ती कशी आत्महत्या करत आहे हे सारे भ्रमणध्वनी मध्ये टिपण्याचा प्रयत्न माणूसकी मेलेली गर्दी करत असते. ही आत्महत्या जलद गतीने जगाकडे कशी पसरेल याचाही प्रयत्न सर्वांचा सुरू असतो.

एक गोष्ट मान्य आहे की आपल्या स्वतःच्या एका चुकीमुळे फ्फार मोठी किंमत आपल्याला मोजावी लागते. आजच्या जगात समोरचा व्यक्ती चुकत आहे व त्यामुळे मोठं नुकसान होऊ शकतं याची जाणीव असुनही कोणीही चुका करणाऱ्या व्यक्तीला थांबवत नाही. याचंच एक उदाहरण द्यायचं म्हटलं तर ते आहे रेल्वेचा प्रवास. रेल्वेच्या डब्यात बसण्यासाठी जागा असूनही तरूण चालत्या गाडीत दरवाजाला लटकलेला असतो. लोकांचे लक्ष वेधण्यासाठी दरवाजाला लटकून स्टंटबाजी करीत असतो. असे करू नको तुझ्या जीवाला धोका आहे असं बोलणारी माणसं त्या क्षणी दिसत नाही उलट मागे उभा राहून तो किती खतरनाक खेळ खेळत आहे याचे चित्रीकरण तो भ्रमणध्वनी मध्ये टिपत असतो. शेवटी असा क्षण येतो की स्टंटबाजी करणाऱ्याचा चुकून हात सुटतो व तो खाली पडतो आणि मरण पावतो. असे चलचित्र लगेच सोशल मिडीयावर पसरवले जातात. मागे उभे राहून चित्रीकरण करण्यापेक्षा स्टंटबाजी थांबवली असती तर एकाचा जीव वाचवला असता. पण नाही, म ाणसातली माणूसकीच मेली आहे ना त्याचा दोष तरी कोणाला देणार!

अतिवृष्टी होते, पूर येऊन जातो गरीबांचे घरं वाहून जातात अशा वेळी समाजसेवक, राजकारणी मंडळी, संस्था, बरेच मंडळ पूरग्रस्त भागात येऊन मदत करतात. त्याच पूरग्रस्त भागात वास्तव्यास असलेली व राजकारणात मुरलेली एक-दोन मंडळीही असतात. तीच मंडळी भेदभाव करत नागरिकांपर्यंत कमी-जास्त मदत पोहचवतात. काहीजणांकडे तर मदत पोहचतच नाही (मुद्दाम मदत केली जात नाही). नुकसान तर प्रत्येकाचे झालेले असते. मग प्रत्येकाला समान मदत का मिळत नाही? राजकारणात मुरलेल्यांची काही जणांची माणूसकीच हरवलेली असते त्याला आपण तरी काय करणार! पूरामध्ये एकीकडे माणूस आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असतो तर दुसरीकडे त्याच पूराच्या पाण्यात गुडघाभर उभा राहून काही जणांना स्वतः चे छायाचित्र (सेल्फ्फी) काढण्याचा मोह आवरत नाही. पूरात वाहून जात असलेले संसार पाहत गर्दी उभी असते. एखाद्याचा जीव किंवा संसार वाचवण्याचा प्रयत्न न करता संसार किंवा माणूस वाहत असताना छायाचित्र काढण्यात माणसं व्यस्त असतात.

पूरग्रस्त भागात राहणाऱ्यांना जेव्हा शासकीय मदत मिळण्याची वेळ येते तेव्हाही माणूसकी मेलेल्या, राजकारणात असलेल्या माणसांचे दर्शन घडते. सरकार प्रत्येक कुटुंबाला ठराविक रक्कम देण्याचे ठरवते. ठरलेली रक्कम पूरग्रस्त भागात पोहचत नाही कारण सरकार आणि सामान्य जनता या दोघांत भ्रष्ट नेते मंडळी असतात. राजकारणात असलेली मंडळी आपली तिजोरी भरून घेतात व नंतर उरलेली रक्कम गरीब जनतेमध्ये वाटतात. येथेही राजकारणात असलेल्या, व समाजाच्या कल्याणासाठी निवडलेल्या व्यक्तींची माणूसकी मेलेली असते.हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला माणसाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. घरात, समाजात, प्रवासात, माणूसकी हरवत चालली आहे याचं फ्फार दु:ख आहे. प्रत्येक क्षणाला माणूसकी हरवल्याचं दर्शन घडत आहे. आज माणसातला माणूस मरून पडलाय की काय असं वाटू लागलं आहे. मोठी दुर्घटना घडते, इम ारत कोसळते, अपघात होतो. ढिगाऱ्याखाली म ाणसं मरून पडली असताना हे सारं पाहण्यासाठी गर्दी होते ती माणूसकी हरवलेल्या माणसांची. अशा वेळी मोठी व्यक्ती येते व मदत (अर्थिक) करण्याचे अश्वासन देते आणि निघून जाते. त्याच ठिकाणी दुसरीकडे गर्दीतलाच एक माणूस ढिगाऱ्याखाली मेलेल्या, गाडल्या गेलेल्या हाडामासाच्या माणसाच्या अंगावरचे मौल्यवान वस्तू काढण्यात मग्न असतो व दुसरा अपघाताचे छायाचित्रे, चलचित्र काढण्यात मग्न असतो. जर एखादी मौल्यवान वस्तू माणूस काढू शकत नाही तर अक्षरशः हातात सोन्याची अंगठी असलेले बोटंच छाटून घेऊन जाण्याचा प्रकार घडताना दिसतो. अशावेळी मदतीचा हात देणाऱ्या गर्दीची फ्फार गरज असते.

रस्त्यावर वाहणाचा अपघात झाल्यावर हीच तोबा गर्दी जमते. माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडला असताना तो जीव वाचवण्यासाठी मदतीचा हात मागत असतो. तेथेही गर्दीत माणसांची अपघाताचे छायाचित्रे काढण्यास चढाओढ लागलेली असते. अशावेळी जखमीला वेळेवर मदत न मिळाल्यामुळे प्राणही गमवावे लागतात. काहीजण तर असेही असतात कि ते गर्दीत येत नाही. लांबूनच पाहून निघून जातात कारण त्यांच्या मनाला असं वाटत असतं कि, आपण ज्या कामाला जात आहे तेथे जाण्यास उशीर होत आहे. पण त्यांना हे कळत नाही की, आपण जर जखमीला मदत करण्यास उशीर केला तर तो देवाघरी लवकर निघून जातील.

खूप दान धर्म करणारी मंडळी या जगात आहेत. एकीकडे असेही चित्र दिसतं की, दान धर्म करणारी व्यक्ती घरात असणाऱ्या (थकलेले) आई वडीलांकडे अजिबात लक्ष देत नाही. कधी काळी थकलेल्या आई वडिलांना त्रासही दिला जातो. घरात आई वडिलांना उपाशी ठेवून बाहेर दान धर्म करत असताना त्यांना पुण्य कसे लाभेल. माणूसकी हरवलेला मुलगा घरात असेल तर आई वडिलांचे असेच हाल होणारच.

जीवाला वैतागलेली व्यक्ती जेव्हा आत्महत्येचा प्रयत्न करत असते तेव्हा आजूबाजूची जनता फक्त तमाशा बघत असते. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला वाचवण्याचा कोणीही प्रयत्न करीत नाही. याच्या उलट ती व्यक्ती कशी आत्महत्या करत आहे हे सारे भ्रमणध्वनी मध्ये टिपण्याचा प्रयत्न माणूसकी मेलेली गर्दी करत असते. ही आत्महत्या जलद गतीने जगाकडे कशी पसरेल याचाही प्रयत्न सर्वांचा सुरू असतो.

एक गोष्ट मान्य आहे की आपल्या स्वतःच्या एका चुकीमुळे फ्फार मोठी किंमत आपल्याला मोजावी लागते. आजच्या जगात समोरचा व्यक्ती चुकत आहे व त्यामुळे मोठं नुकसान होऊ शकतं याची जाणीव असुनही कोणीही चुका करणाऱ्या व्यक्तीला थांबवत नाही. याचंच एक उदाहरण द्यायचं म्हटलं तर ते आहे रेल्वेचा प्रवास. रेल्वेच्या डब्यात बसण्यासाठी जागा असूनही तरूण चालत्या गाडीत दरवाजाला लटकलेला असतो. लोकांचे लक्ष वेधण्यासाठी दरवाजाला लटकून ङ्गस्टंटबाजीङ्ख करीत असतो. असे करू नको तुझ्या जीवाला धोका आहे असं बोलणारी माणसं त्या क्षणी दिसत नाही उलट मागे उभा राहून तो किती खतरनाक खेळ खेळत आहे याचे चित्रीकरण तो भ्रमणध्वनी मध्ये टिपत असतो. शेवटी असा क्षण येतो की स्टंटबाजी करणाऱ्याचा चुकून हात सुटतो व तो खाली पडतो आणि मरण पावतो. असे चलचित्र लगेच सोशल मिडीयावर पसरवले जातात. मागे उभे राहून चित्रीकरण करण्यापेक्षा स्टंटबाजी थांबवली असती तर एकाचा जीव वाचवला असता. पण नाही, माणसातली माणूसकीच मेली आहे ना त्याचा दोष तरी कोणाला देणार!

अतिवृष्टी होते, पूर येऊन जातो गरीबांचे घरं वाहून जातात अशा वेळी समाजसेवक, राजकारणी मंडळी, संस्था, बरेच मंडळ पूरग्रस्त भागात येऊन मदत करतात. त्याच पूरग्रस्त भागात वास्तव्यास असलेली व राजकारणात मुरलेली एक-दोन मंडळीही असतात. तीच मंडळी भेदभाव करत नागरिकांपर्यंत कमी-जास्त मदत पोहचवतात. काहीजणांकडे तर मदत पोहचतच नाही (मुद्दाम मदत केली जात नाही). नुकसान तर प्रत्येकाचे झालेले असते. मग प्रत्येकाला समान मदत का मिळत नाही? राजकारणात मुरलेल्यांची काही जणांची माणूसकीच हरवलेली असते त्याला आपण तरी काय करणार! पूरामध्ये एकीकडे माणूस आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असतो तर दुसरीकडे त्याच पूराच्या पाण्यात गुडघाभर उभा राहून काही जणांना स्वतःचे छायाचित्र (सेल्फ्फी) काढण्याचा मोह आवरत नाही. पूरात वाहून जात असलेले संसार पाहत गर्दी उभी असते. एखाद्याचा जीव किंवा संसार वाचवण्याचा प्रयत्न न करता संसार किंवा माणूस वाहत असताना छायाचित्र काढण्यात माणसं व्यस्त असतात. पूरग्रस्त भागात राहणाऱ्यांना जेव्हा शासकीय मदत मिळण्याची वेळ येते तेव्हाही माणूसकी मेलेल्या, राजकारणात असलेल्या माणसांचे दर्शन घडते. सरकार प्रत्येक कुटुंबाला ठराविक रक्कम देण्याचे ठरवते. ठरलेली रक्कम पूरग्रस्त भागात पोहचत नाही कारण सरकार आणि सामान्य जनता या दोघांत भ्रष्ट नेते मंडळी असतात. राजकारणात असलेली मंडळी आपली तिजोरी भरून घेतात व नंतर उरलेली रक्कम गरीब जनतेमध्ये वाटतात. येथेही राजकारणात असलेल्या, व समाजाच्या कल्याणासाठी निवडलेल्या व्यक्तींची माणूसकी मेलेली असते.

## 'पिंजरा मत्स्यसंवर्धन तंत्रज्ञानाबाबत' प्रशिक्षण कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पिंजरा मत्स्यसंवर्धनाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग, पुणे यांच्याकडून 'पिंजरा मत्स्यसंवर्धनाबाबत' सखोल प्रशिक्षण कार्यशाळा २५ ते २७ मार्च २०२५ रोजी कृषि महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजीत करण्यात आली आहे.

'पिंजरा मत्स्यसंवर्धन' तंत्रज्ञान किफायतशीर होण्यासाठी पिंजरे स्थापित केल्यानंतर प्रत्यक्ष मत्स्यबीज संचयनापुर्वी पुर्वतयारी बरोबरच मत्स्यसंवर्धनामध्ये खाद्य व्यवस्थापनासह माशांचे आरोग्य व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने करणे अत्यंत आवश्यक असते. तसेच उत्पादनाबरोबर विक्री व्यवस्थापन महत्वाचे आहे.

कार्यशाळेमध्ये शास्त्रोक्त पिंजरा मत्स्यसंवर्धनाबाबत महत्वाचे बारकावे सखोल पद्धतीने समजावून घेण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञ, प्राध्यापक, तज्ञ अधिकारी व अनुभवी पिंजरासंवर्धक यांचेमार्फत सविस्तर मार्गदर्शन तसेच पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रात्यक्षिक दाखविण्यात येणार आहे.

प्रशिक्षणामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, व परभणी या ८ जिल्ह्यांमध्ये केज प्रकल्प असलेल्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा अंतर्गत योजनेतील सर्व पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्पधारक तसेच पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्प मंजूर झालेल्या लाभार्थींनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे' असे आवाहन पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त म त्स्यव्यवसाय विजय शिखरे यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

माहितीसाठी ९४२३७५८८२४, ९८८१६००९५१ व ८२०८४१३०११ या क्रमांकांवर संपर्क करावा.

## क्षुल्लक कारणावरून देवळाणा येथे दोन गटात हाणामारी; दोन्ही गटातील १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील-देवळाणा खुर्द येथे घरासमोरील वाळू मुलांनी पांग विल्या वरुन दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना शनिवारी (दि.२२) रात्री आठच्या दरम्यान घडली,या प्रकरणी रविवारी (दि.२३) खुलताबाद पोलीस ठाण्यात दोन्ही गटाकडून परस्पर विरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.या बाबत अजिज मेहबूब पटेल,रा.देवळाणा खुर्द यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार माझे घरासमोर साठवलेले वाळूचे ढिगारावर मुले खेळत असतांना शकीला मुसा पटेल हिने शिवीगाळ केली म्हणुन समजावण्यास गेलो असता, मुस्तफा मुसा पटेल, इसाक उस्मान पटेल, इब्राहीम युसुफ पटेल, यांनी कोयता, लोखंडी रॉड, काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तर शकीला मुसा पटेल, गुलशनबी इसाक पटेल, समीर अनीस पटेल, अलिशान युसुफ पटेल सर्व रा. देवळाणा खुर्द यांनी लाथा बुक्क्यानी मारहाण करुन शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात परस्पर विरोधी फिर्याद देतांना मुस्तफा मुसा पटेल रा.देवळाणा खुर्द यांनी नमुद केले आहे की, माझे घरासमोर असलेले वाळूचे ढिगार मुलांनी का पांगविले म्हणुन विचारणा करण्यास गेलो असता अजीज मेहबूब पटेल, शाकीर मेहबूब पटेल,जावेद महेबुब पटेल, महेबुब अकबर पटेल, सुलतानाबी अजीज पटेल, शाईन जावेद पटेल, सिमा शाकीर पटेल, सर्व रा.देवळाणा खुर्द यांनी या घटनेतील साक्षीदार ईसा उस्मान पटेल, गुलशन इसाक पटेल, शकीला मुसा पटेल यांना कोयता, लोखंडी रॉडने मारहाण करीत जखमी केले, तसेच लाथा बुक्क्यानी मारहाण करुन शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धम की दिली. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण भोजने हे करीत आहेत.

## मिना मस्जिद येथे इफ्तार पार्टी,माजी उपनगराध्यक्ष सलीम कुरैशी यांच्या वतीने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

माजी उपनगराध्यक्ष सलीम कुरैशी आणि हनीफ कुरैशी यांच्या वतीने शहरातील मिना मशीदीच्या प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला हिंदू बांधवांनी ही मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने आयोजित या इफ्तार पार्टीत सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येऊन सामाजिक सलोखा आणि ऐक्याचा संदेश दिला. उपस्थितांनी एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा देत सद्भावनेचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाला भद्रा मारुती मंदिराचे अध्यक्ष मिठू पाटील बारगळ, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस किरण पाटील डोणगावकर, विलासराव चव्हाण, जगन्नाथ बापू खोसरे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अनिल श्रीखंडे, माजी नगराध्यक्ष अँड. एस.एम. हाजी अकबर बेग.माजी नगरसेवक रवींद्र ढवळे. भागिनाथ मरकड, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, ज्ञानेश्वर बारगळ, गीताराम काळे, मनोज शिंपी, फकीरचंद, माजी नगराध्यक्ष नवनाथ बारगळ, मनोहर लाळे, उमेश सावजी, माजी नगरसेवक मकसूद पटेल, माजी नगरसेवक डॉ. मोईनोद्दीन कादरी, अनिस जागीरदार, मच्छिंद्र लिंगायत, माजी उपनगराध्यक्ष अँड. शब्बीर अहमद, रईस जागीरदार, जावेद कुरेशी. मोहम्मद नईम बक्ष, इमरान जागीरदार, दर्गा कमिटीचे सदस्य शेख कामरानोद्दीन. शेख रियाजोद्दीन, राहुल हजारे. राजेंद्र सोनवणे यांचे सह हिंदू-मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सलीम कुरैशी यांनी यावेळी सांगितले की, 'सण आणि उत्सव हे लोकांना जोडण्यासाठी असतात. अशा कार्यक्रमांमधून समाजामध्ये एकोपा आणि विश्वास वाढतो. या इफ्तार पार्टीला शहरातील अनेक मान्यवर, समाजसेवक आणि नागरिकांनी उपस्थिती लावून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

## स्टार्टअप मेळावा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

२३ मार्च रोजी, म्हाडा कॉलनी येथे मा. आमदार सौं. अनुराधाताई चव्हाण ह्यांचा मार्गदर्शनाखाली आत्मनिर्भर फाऊंडेशन आणि आकाश भाऊ नरवडे तर्फे आयोजित स्टार्टअप मेळावा आयोजित करण्यात आला होता.

महिलांचा प्रभावी असं सहभाग होता. मेळावा मध्ये ८० लोकांचे एमएसएमई-स्टार्टअपसाठी रजिस्ट्रेशन करण्यात आले.

येणारे काही दिवसात आपल्या प्रभागाम ध्ये आपण 'हर घर उद्योग ' हि संकल्पना राबावणार आहे.प्रत्येक घरामध्ये नौकरी देणारे सदस्य असला पाहिजे तरच आपला प्रभाग हा सक्षम होऊ शकतो.रोजगार हि एक मोठी समस्या आहे त्याला आपण एकत्र येऊन यशस्वी करू शकतो.



मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र जी मोदी ह्यांनी महिलां, युवक आणि कामगार वर्ग साठी उत्कृष्ट असे योजना लाँच केले आहेत परंतु योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे आपण सगळे ह्या लाभ पासून वंचित राहिलो आहे.

मी अशा करतो कि आपल्या प्रभागातील काही जेष्ठ, तज्ज्ञ मंडळीने 'हर घर उद्योग' ह्या संकल्पमध्ये पुढे यावे आणि प्रभागाला सक्षम करण्यास आपले योगदान द्यावे,असेही आकाश नरवडे यांनी सांगितले..!

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर - आगामी सणांच्या पार्श्वभुमिवर कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.७ एप्रिल पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## नागपूरमधून संचारबंदी हटवली

नागपूर : नागपूर पोलिसांनी रविवार २३ मार्च २०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यापासून कोतवाली, गणेशपेठ, यशोधरानगर आणि तहसीलसह सर्व संचारबंदी असलेल्या भागांमधून संचारबंदी हटवली आहे. याआधी १७ मार्च रोजी शहरात उसळलेल्या हिंसाचारानंतर नागपूरचे पोलीस आयुक्त रविंद्र सिंगल यांनी संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १० पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. आता परिस्थिती नियंत्रणात आल्याने आणि शांतता प्रस्थापित झाल्याने संपूर्ण शहर संचारबंदी मुक्त झाले आहे.

संचारबंदीच्या काळात संबंधित भागांतील सर्व दुकानं, बाजारपेठा, शाळा आणि व्यावसायिक आस्थापनांना बंद ठेवले होते. सततच्या बंदमुळे सामान्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर परिस्थिती नियंत्रणात आल्यावर पोलिसांनी संचारबंदी हटवली आहे. यामुळे नारिकांना दिलासा मिळाला आहे. याआधी संचारबंदीच्या काळात परिस्थिती थोडी नियंत्रणात आल्यावर गणेशपेठ, कोतवाली आणि तहसील भागात नागरिकांना सकाळी ७ ते १० या वेळेत आवश्यक वस्तू खरेदीसाठी सवलत देण्यात आली होती. मात्र, यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी कायम होती. नागरिकांना घराबाहेर पडण्यास बंदी होती. रविवारी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नागपूर पोलिसांनी संपूर्ण शहरातून संचारबंदी हटवली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता ठेवावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागपुरातील हिंसाचार प्रकरणात आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली असून, त्यापैकी ९२ जणांना अटक करण्यात आली आहे.

# एसटी महामंडळात बदल्या होणार सुपरफास्ट

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळात अनेक वर्षे एकाच ठिकाणी अधिकारी असल्यामुळे कारभारात अपेक्षित गतिमानता येत नाही, अशी ओरड होऊ लागली आहे. याची गंभीर दखल घेत राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळात सुपरफास्ट बदल्या करण्याचे नियोजन केले आहे. एसटी महामंडळात एकाच मुख्यालयात तीन वर्षांपेक्षा जास्त काळ कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या तातडीने बदल्या करण्याचे आदेश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाला सोमवारी दिले. यामुळे राज्यातील सुमारे एक हजार अधिकाऱ्यांची बदली होणार आहे. या बदल्यांचे आदेश लवकरच जारी होणार असल्याचे वृत्त आहे.

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वात कामगार संघटनांनी सरनाईक यांची भेट घेतली. यावेळी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनवार उपस्थित होते. याप्रसंगी झालेल्या चर्चेत अधिकाऱ्यांचा मुद्दा आला. अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी असल्यामुळे निवडक कर्मचाऱ्यांशी हितसंबंध निर्माण होणे, तून आर्थिक गैरव्यवहारांची शक्यता वाढणे, महामंडळाच्या कामांव्यतिरिक्त अन्य कामांसाठी हितसंबंधांचा गैरवापर करणे असे प्रकार सुरू होतात. यामुळे सामान्य कर्मचाऱ्यांवर अन्याय होतो. एसटी महामंडळाच्या सेववर प्रतिकूल परिणाम होतो. यामुळे एकाच मुख्यालयात तीन वर्षांपेक्षा जास्त वेळ कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी, असे निवेदन आमदार पडळकर यांनी दिले. अधिवेशन संपल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून बदल्यांबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सरनाईक यांनी दिले. यानंतर बदल्यांचे नियोजन सुरू झाले आहे.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटी महामंडळाच्या १३१० बस खरेदी करण्याच्या निविदेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यानंतर सुपरफास्ट बदल्यांचे नियोजन झाले.

# छत्रपती संभाजीनगर पोलिसांना नवीन ३३ वाहनांचा ताफा; गुन्हेगारी नियंत्रणासाठी मोठे बळ

## पोलीस दल अधिक बळकट करण्यावर भर –पालकमंत्री शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील कायदा–सुव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पोलिसांना अत्याधुनिक साधन–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने ५ कोटी रुपयांच्या निधीतून ३३ नव्या वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. अत्याधुनिक सुविधा, साधने उपलब्ध करून पोलीस दल अधिक सक्षम व बळकट करण्यावर शासनाचा भर असल्याचे यावेळी पालकमंत्री शिरसाट यांनी जाहीर केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्याला खासदार डॉ. कल्याण काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. वीरेंद्र राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, राजेंद्र जंजाळ, नंदकुमार घोडेले आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी पोलिसांना सक्षम बनवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.



गुन्हेगारीच्या निर्मूलनासाठी आणि शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना आवश्यक ती साधने पुरवली जातील. पोलिसांनी जबाबदारीने काम करावे आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळवून द्यावा,असे सांगितले.

यावेळी पोलिसांसाठी अँम्ब्युलन्स देण्याचाही निर्णय जाहीर करण्यात आला. पोलिसांचे मनोबल वाढवण्यासाठी शासन त्यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहील, असेही मंत्री शिरसाट यांनी सांगितले. 'आगामी काळात आणखी ३० वाहने पोलिसांना देण्यात येणार आहेत,' असेही त्यांनी जाहीर केले.

पोलीस दलाच्या या आधुनिकीकरणामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, तसेच गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. खा. डॉ. कल्याण काळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर हिरवी झेंडी दाखवून नवीन वाहने पोलीस दलात समाविष्ट करण्यात आली.

**पोलीस दलाला नवीन ३३ वाहने**
पोलीस अधीक्षक कार्यालय : १० वाहने
पोलीस आयुक्त कार्यालय : १५ वाहने
राज्य राखीव पोलीस दल : ८ वाहने
(यात एका बसचा समावेश)

# जागतिक जल दिनानिमित्त वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## जलसंकट दूर करण्यासाठी सगळ्यांचा सहयोग आवश्यक-राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनाच्या विविध योजना आणि उपाययोजनाद्वारे मराठवाड्यावरील जलसंकट दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नांमध्ये सगळ्यांचा सहयोग आवश्यक आहे, असे आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी आज येथे केले.

जागतिक जल दिनानिमित्त शहरात वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. विभागीय क्रीडा संकुल येथून सुरुवात होऊन संत गजानन महाराज मंदिरापर्यंत जाऊन पुन्हा क्रीडा संकुल येथे समारोप करण्यात आला. या वॉकेथॉनला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमास पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, सामाजिक वनिकरण विभागाच्या विभागीय वन अधिकारी कीर्ती जमदाडे, जिल्हा क्रीडा अधिकारी संभाजी देसाई, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, स्टरलाईट चे मिलिंद पाटील, ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपसिंग बयाज, जिल्हा समन्वयक किरण बिलोरे यांसह विविध विभागांचे अधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पाण्याच्या जपून वापराबाबत मार्गदर्शन करत जलसंवर्धनासाठी प्रशासनाने हाती घेतलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले की, मराठवाड्याच्या जलसमृद्धीसाठी शासन विविध उपक्रम राबवत असून, त्याला सर्व संस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जलसंकट दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीपसिंग बयाज यांनी केले. सूत्रसंचालन मीनाक्षी बालकमल यांनी केले, तर आभार प्रदर्शन किरण बिलोरे यांनी केले.

# भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष जंबुप्रसाद जैन यांची राजाबजार जैन मंदिराला भेट



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आज भारतवर्षीय दिंगबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष जंबुप्रसाद जैन यांनी भगवान शांतीनाथांचे दर्शन घेतले. यावेळी पंचायत च्या वतीने भगवान शांतीनाथांचे प्रतिमा असलेला फोटो शाल श्रीफळ देवुन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यकमाचे प्रास्ताविक पंचायत चे अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले तर सुत्रसंचालन सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले. यावेळी तिर्थक्षेत्र कमिटीचे माजी प्रांताध्यक्ष व राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पापडीवाल, प्रमोद जैन कासलीवला यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जंबुप्रसाद जैन यांनी तीर्थरक्षा कमिटी हि १२३ वर्ष जुनी असुन समाज बांधवांनी या तीर्थक्षेत्र कमिटीला सहकार्य करावे. व आगामी २२ ऑक्टोंबर २०२६ ते २२ ऑक्टोबर २०२७ पर्यत संपुर्ण वर्षभर एक महामहोत्सवाचे आयोजन या कमिटीच्या वतीने करण्यात येणार आहे. संपुर्ण चातुर्मास काळात तीर्थरक्षा कमिटीचे तीर्थरक्षा सुरक्षा कळस चातुर्मास दरम्यान प्रत्येक ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याची त्यांनी सांगीतले. जेथे जेथे जुन्या मंदिराच्या जिर्णोध्दाराची आवश्यकता आहे त्या ठिकाणी तीर्थक्षेत्र कमिटीच्या वतीने सहयोग करण्यात येणार आहे असेही त्यांनी सांगीतले.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, विश्वस्थ अरफण पाटणी, महावीर ठोले, चंदा कासलीवाल, निता ठोले, डॉ.प्रकाश पापडीवाल, प्रकाश कासलीवाल, केतन ठोले, अभय कासलीवाल, फुलचंद ठोले आदींची यावेळी उपस्थिती होती. आज जंबुप्रसाद जैन श्री.क्षेत्र कचनेर, श्री.क्षेत्र जटवाडा येथे जावुन भगवंताचे दर्शन घेवुन क्षेत्राचे अवलोकन केले तसेच आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचे जालना येथे जावुन दर्शन घेतले. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# राष्ट्रीय लोकअदालत:६९१० प्रकरणे सामोपचाराने निकाली

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे आयोजीत लोक अदालत शनिवार दि.२२ रोजी पर पडली. या लोकअदालतीत ६९१० प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाले असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस यांनी कळिवले आहे.

लोक अदालतीच्या यशस्वतीतेसाठी अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा.पी.इंगळे, जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांच्या मार्गदशनाखाली वेगवेगळे शासकीय अधिकारी, विद्युत कंपनीचे अधिकारी, वित्तीय संस्था,वकील व बँकेचे अधिकारी यांच्यासोबत बैठका घेण्यात आल्या होत्या. लोकअदालतीच्या तयारीसाठी सर्व न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, सरकारी वकील, वित्तीय संस्थाचे अधिकारी, विमा कंपनीचे अधिकारी, पोलीस अधिकारी, भूसंपादन




अधिकारी, भूसंपादन संस्थेचे अधिकारी, मोबाईल कंपनीचे अधिकारी इ. सोबत बैठका घेतल्या. बैठकीत प्रलंबित प्रकरणाचे संबंधित घटकांना लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने निकाली काढण्याचे आवाहन करण्यात आले होते.

राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोटार अपघात, विद्युत चोरीची,धनादेश अनादर प्रकरणे, कौटुंबिक, भूसंपादन व तडजोडयुक्त दिवाणी व फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आलेली होती. वादपूर्व प्रकरणामध्ये युनियन बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब बँक नॅशनल बँक, महारष्ट्र बँक, महाराष्अ्र ग्रामीण बँक, बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, इंडियन ओव्हरसिज बँक, बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, युको बँक, एस.बी.आय.क्रेडीट, आय.सी.आय. सी.आय.बँक, जॉन डिअर फायनान्स, उज्जीवन स्मॉल फायानान्स, व्होडाफोन, एल ॲण्ड टी फायानन्स, धनी लोन्स फायनान्स, आय.सी.आय.सी.आय.बँक आणि मध्यस्थी केंद्रामधील वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. लोक अदालतीमध्ये एकूण २४९० प्रलंबित व ४४२० दाखलपूर्व असे एकूण ६९१० प्रकरणांमध्ये तडजोड होऊन प्रलंबित प्रकरणांमध्ये एकूण रक्कम ५९ कोटी ३९ लक्ष ९५ हजार १ रुपये व वादपूर्व प्रकरणामध्ये एकूण रक्कम ३२ कोटी ५२ लक्ष १० हजार ८७१ रुपये इतकी वसूली झाली. अशी एकूण रक्कम रु.९१ कोटी ९२ लक्ष ५ हजार ८७२ एवढ्या रक्कमेचा समावेश असलेली प्रकरणे लोक अदालतीमध्ये तडजोडीने निकाली निघाली. लोकअदालतीमध्ये जिल्ह्यात एकूण ३२ पॅनल करण्यात आले होते. सर्व पॅनलच्या न्यायाधीशांनी त्यावर आपले योगदान दिले. एकूण ६९१० प्रकरणांमधील पक्षकरांना न्याय मिळाला. लोकअदालतीमध्ये जिल्हा वकील संघाने सहभाग नोंदवला. तसेच अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा.पी.इंगळे,जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश –१ डि.एच. केळुसकर यांच्या मार्गदर्शानालखा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती वैशाली पी. फडणीस व न्यायीक अधिकारी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816